## ३) सोने तारण कर्जे :-

सोने तारण कर्जदाराकडून कर्ज मागणी अर्ज, वचनचिठ्ठी, करारपत्र, संमतीपत्र व सराफाचा दाखला इत्यादी कागदपत्रे घेणेची आहेत.

१ सोने तारण कर्ज उचलीपूर्वी कर्जदार व्यक्तिश: नाममात्र सभासद करुन घेवूनच उचल दिली जाईल. सदर कर्जाची मुदत १ वर्षाची राहील.

२ सोन्याचे जिन्नस/दागिने कर्जदाराने स्वत:चे मालकीची असलेबद्दलची खात्री करुन दिली पाहिजे. याबाबत सोनेतारण कर्जमागणी अर्जासोबत कर्जदाराची ओळख पत्राची प्रत (पॅन कार्ड,आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स यापैकी एक) आवश्यक.

३ बँकेच्या अधिकृत सराफाने चालू बाजार भावाने ठरवून दिलेल्या चोख सोन्याच्या किंमतीच्या ---% अथवा बँकेने ठरविलेल्या प्रतिग्रॅमचा दर यापैकी कमी असलेली रक्कम सोने गहाण कर्ज म्हणून देणेत येईल.

४ चोख सोन्याबाबत सराफाची माहिती ग्राह्य धरणेत येईल.

५ पूर्वसूचना न देता प्रचलित नियमामध्ये बदल करणेचा, नियम रद्द करणेचा तसेच नविन नियम करणेचा अगर दुरुस्ती करणेचा अधिकार बँकेस राहील.